# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# दुपारी 01 वाजून 30 मि

**दिनांक: 31.07.2021** **वार: शनिवार**

---

**आधी एक विनंती...**

**महाराष्ट्रात 18 वर्षांवरील सर्वांसाठी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहीम सुरू झाली आहे. सर्वांनी लसीकरण करून घ्या. पण नंतरही काळजी घ्या. मुखपट्टी वापरा, सुरक्षित अंतर राखा, हात, चेहरा वारंवार स्वच्छ धुवा. विनाकारण घराबाहेर पडून गावात गर्दी करू नका. कोविड-19 बद्दल काही प्रश्न असतील तर 011-23 978 046 आणि 1075 या राष्ट्रीय; तसंच 020-26-127-394 या महाराष्ट्रासाठीच्या हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधा.**

---

1. कामातील कौशल्यं आणि तंदुरूस्ती या पोलिस दलाच्या दोन सर्वात महत्वाच्या गरजा असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन, युवकांमध्ये तंदुरूस्तीचा प्रचार करण्याचं युवा अधिकाऱ्यांना आवाहन
2. देशात आज सकाळी संपलेल्या चोवीस तासात 41 हजार 649 नवीन कोरोनाबाधितांची नोंद तर 37 हजार 291 रुग्ण कोरोनामुक्त
3. आयुष्मान भारत योजनेखाली आजवर देशातील 10 कोटी कुटुंबाना लाभ
4. क्युबामधील लोकशाही समर्थक निदर्शनं दडपल्याबद्दल अमेरिकेद्वारे क्युबामधील पोलिस दलावर निर्बंध लागू आणि
5. न्यूज ऑन ए आय आर ॲप जयपूर आणि पाटणामधील युवकांमध्ये जास्त लोकप्रिय, केंद्रांच्या क्रमवारीत पुणे अव्वल

---

**<u>मोदी आयपीएस प्रशिक्षणार्थी</u>**

माओवाद्यांचा हिसांचार आपण कठोर मेहनतीनं आटोक्यात आणत असून आदिवासी भागांमध्ये आपण विकास आणि विश्वासाचे नवे पुल बांधले असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी इथं आयपीएस प्रशिक्षणार्थींसोबत संवाद साधताना ते बोलत होते. आपल्यासारखं युवा नेतृत्व हे काम पुढे नेईल अशी खात्री असल्याचं मोदी यांनी सांगितलं. पोलिसांनी तंदुरूस्तीचा प्रचार-प्रसार केला तर समाजातील युवकांना देखील तंदुरूस्त राहण्यासाठी आणखी प्रोत्साहन मिळेल अशी सूचना त्यांनी केली. कामातील कौशल्यं आणि तंदुरूस्ती या आपल्या पोलिस दलाच्या दोन सर्वात महत्वाच्या गरजा असल्याचं सांगून पंतप्रधानांनी आपल्यासारखे युवा पोलिस अधिकारी पोलिस यंत्रणेमध्ये अशा प्रकारच्या सुधारणा लागू करु शकतात असा विश्वास व्यक्त केला. गेल्या 75 वर्षांमध्ये, भारतानं एक उत्तम पोलिस सेवा उभारण्याचा प्रयत्न केला आहे, पोलिस प्रशिक्षणाशी निगडीत पायाभूत सुविधा देखील अलिकडील वर्षांमध्ये खूप सुधारल्या असल्याचं मोदी म्हणाले. यामध्ये सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना पंतप्रधानांनी विविध प्रश्न विचारले त्यावर या अधिकाऱ्यांनी आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय हे देखील उपस्थित होते. हैदराबादची सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी ही देशातली प्रमुख पोलीस प्रशिक्षण संस्था आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधून भारतीय पोलीस सेवेसाठी निवड झालेल्या अधिकाऱ्यांना इथे प्रशिक्षण दिलं जातं.

**आयुष्मान भारत योजना**

आयुष्मान भारत योजनेमध्ये आत्तापर्यंत 10 कोटी कुटुंबांना समाविष्ट करण्यात आलं असून,या योजने द्वारे आता 50 कोटी व्यक्ती 5 लाखापर्यंत मोफत उपचारास पात्र असल्याचं आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री मनसुख मांड्वीय यांनी काल लोकसभेत बोलताना सांगितलं. यावेळी मांड्वीय म्हणाले की आयुष्मान भारत ही योजना अमेरिकेच्या ओबामा केयर योजनेपेक्षा 5 पट मोठी योजना आहे. सरकारनी अवयवदान आणि अवयव प्रत्यारोपणासाठी अनुकूल वातावरण तयार करण्याच्या दिशेनं उपाय योजना सुरू केल्या आहेत. आयुष्मान भारत योजनेची सुरुवात सर्वांना आरोग्य विमा योजनेचा लाभ घेता यावा यासाठी सुरू करण्यात आली होती. त्याची आखणी विकासाचं उद्दिष्ट समोर ठेऊन करण्यात आली असल्याचंही ते यावेळी म्हणाले.

**देश-कोविड**

देशात आज सकाळी संपलेल्या चोवीस तासात 41 हजार 649 नवीन कोरोनाबाधितांची नोंद झाली. तर 37 हजार 291 रुग्ण कोरोनामुक्त झाले. या कालावधीत कोविड-19 मुळे 593 मृत्युंची नोंद झाली. देशात सध्या 4 लाख 8 हजारांहून अधिक कोरोना रुग्ण उपचार घेत आहेत. त्यांचं प्रमाण 1 पूर्णांक 28 शतांश टक्के आहे. तर बरे झालेल्या कोरोना रुग्णांचं प्रमाण 97 पूर्णांक 38 शतांश टक्के आहे. कोविड-19 मुळे देशात आजवर दगावलेल्यांची संख्या 4 लाख 23 हजारांहून अधिक झाली आहे. कोविड प्रतिबंधात्मक लसींच्या 46 कोटी 15 लाखांहून अधिक मात्रा आजवर देशभरात देऊन झाल्या आहेत. काल दिवसभरात सुमारे 53 लाख लसींच्या मात्रा देण्यात आल्या. लसीकरणात उत्तरप्रदेश प्रदेश प्रथम, महाराष्ट्र दुसऱ्या तर गुजरात तिसऱ्या स्थानावर कायम आहेत.

**क्युबा**

क्युबामधील कम्युनिस्ट सरकारच्या विरोधात अलिकडे झालेल्या निदर्शनांनंतर अमेरिकी प्रशासनानं क्युबाचे पोलिस दल आणि त्यातील दोन अधिकाऱ्यांवर निर्बंध लागू केले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन यांनी क्युबन-अमेरिकी नेत्यांच्या बैठकीत काल सांगितलं की क्युबामध्ये काही मोठा बदल घडून आला नाही तर आणखी निर्बंध लागू करण्यात येतील. क्युबामध्ये 11 जुलैपासून सुरु झालेली शांततापूर्ण, लोकशाही-समर्थक निदर्शनं दाबून टाकण्यासाठी केलेल्या कारवाईवर प्रतिक्रिया आल्याचं सांगून अमेरिकेनं या ताज्या निर्बंधांची घोषणा केली आहे.

**तेलवाहू जहाज- अमेरिका**

उत्तर कोरियासाठी तेल घेऊन जाणारं सिंगापूरच्या मालकीचं एक तेलवाहू जहाज अमेरिकेनं ताब्यात घेतलं आहे. अशी वाहतूक आंतरराष्ट्रीय निर्बंधांचं उल्लंघन असल्याचं अमेरिकेच्या न्याय विभागानं म्हटलं आहे. एम टी करेजियस नावाचं हे जहाज सध्या कंबोडियात असून ते ताब्यात घेण्याचा अधिकार देणारा निर्णय न्यू यॉर्क संघीय न्यायाधीशानं दिला आहे. 2 हजार 700 टनांहून अधिक क्षमतेचं हे जहाज सिंगापूरच्या एका नागरिकानं विकत घेतलं होतं आणि त्याचा मालक फरार असल्याचं न्याय विभागानं काल जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे. उत्तर कोरियातील नाम्पो या बंदरात थेट तेल वाहतूक आणि तेलजन्य उत्पादने उत्तर कोरियाच्या जहाजांवर चढवण्यासाठी या जहाजाचा वापर केला जात होता.

**ईस्राईल-इराण**

इराणनं आपल्या एका तेलवाहू जहाजावर हल्ला केला असल्याचा आरोप इस्रायलनं केला आहे. या हल्ल्यात एक ब्रिटीश आणि एक रोमानियन नागरिक ठार झाले. लंडनस्थित एका कंपनीद्वारे संचालित हे जहाज गुरुवारी अरबी

समुद्रात ओमानच्या किनाऱ्याजवळ असताना ही घटना घडली होती. नेमकं काय घडलं ते शोधण्याचा आपण प्रयत्न करत असल्याचं जहाजाच्या मालक कंपनीनं म्हटलं आहे. पण इस्त्रायलचे परराष्ट्र मंत्री याईर लेपिड यांनी ही घटना म्हणजे इराणी दहशतवाद असल्याचं काल सांगितलं. ही समस्या केवळ इस्त्रायलची नाही, आणि जगानं अशा घटनांवरुन गप्प बसता कामा नये असंही लेपिड म्हणाले.

**न्यूज ऑन ए आय आर**

न्यूज ऑन ए आय आर या ॲपद्वारे आकाशवाणीचं थेट प्रसारण जयपूर आणि पाटणा या शहरांमधील युवकांमध्ये जास्त लोकप्रिय असल्याचं दिसून आलं आहे. या दोन शहरात ॲपद्वारे आकाशवाणीचं थेट प्रसारण ऐकणाऱ्या लोकांमध्ये 60 टक्के श्रोतावर्ग हा 18 ते 45 वर्षे वयोगटातील असल्याचं निदर्शनास आलं आहे. देशातील मोठ्या शहरांमध्ये केलेल्या न्यूज ऑन ए आय आर च्या क्रमवार सर्वेक्षणात ही बाब समोर आली आहे. पुणे शहरानं आपल्या लोकप्रियतेचा परिचय आपल्या प्रसारणातून करून दिला असून मराठी प्रसारणाबरोबरच कन्नड आणि हिंदी भाषेतील प्रसारण सुद्धा तितकंच लोकप्रिय असल्याचं स्पष्ट झालं आहे. ताज्या क्रमवारीनुसार न्यूज ऑन ए आय आर या ॲपद्वारे होणाऱ्या आकाशवाणीच्या थेट प्रसारणात सर्व शहरांमध्ये पुणे आकाशवाणी अग्रस्थानी आहे. यानंतर बंगळूरू आणि हैद्राबाद केंद्रांचा क्रमांक लागतो. न्यूज ऑन ए आय आर या ॲपवरून प्रसार भारतीच्या 240 पेक्षा अधिक रेडीओ सेवांचं प्रसारण केलं जातं.

**चित्रपट प्रभाग उधम सिंह**

क्रांतिकारी देशभक्त शहीद उधम सिंह यांच्या 81 व्या स्मृतीदिनी आज त्यांच्या चरित्रपटाचं प्रदर्शन चित्रपट विभागाद्वारे केलं जाणार आहे. शहीद उधम सिंह यांचं जीवनकार्य, देशभक्ती आणि निर्धार याची कहाणी या चित्रपटांमधून दाखवली जाणार आहे. स्वातंत्र्याची 75 वर्ष साजरी करण्यासाठीच्या आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमाचा हा एक भाग असेल. आज दिवसभर चित्रपट प्रभागाच्या संकेतस्थळावर आणि यूट्यूब वाहिनीवर हा चित्रपट पाहता येणार आहे.

**नागालँड बेटी**

नागालँडमधल्या 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियानाद्वारे जनजागृतीसाठी एक विशेष मोहीम सुरू केली आहे. बाल लैंगिक अत्याचार, बाल मजुरी, बाल हक्क, मानवी तस्करी आणि स्थलांतर याबाबत 'जानो, खेलो, जितो' या खेळाच्या माध्यमातून लोकांना माहिती करून दिली जाणार आहे. गोव्यातल्या 'अन्यायरहित जिंदगी' या स्वयंसेवी संस्थेनं या खेळाची रचना केली आहे.

**काश्मीर- आयईएस**

दक्षिण काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यातील कुंड नागीनपोरा इथल्या तन्वीर अहमद खान या युवकानं, केंद्रीय लोकसेवा आयोगानं घेतलेल्या इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिसेस म्हणजेच आयईएस परीक्षेत राष्ट्रीय पातळीवर दुसरा क्रमांक मिळवला आहे. या प्रतिष्ठित परीक्षेत पात्र होण्याचा गौरव मिळवणारा तो जम्मू-काश्मीरमधला पहिला विद्यार्थी ठरला आहे. या कामगिरीमुळं तन्वीरनं जम्मू-काश्मीरचा नाव लौकिक उंचावला आहे.

**झारखंड केरळ कोविड**

झारखंडमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्यामुळे व्यावसायिक आस्थापना आणि शैक्षणिक संस्थांवरचे निर्बंध शिथील करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. नव्या नियमावलीनुसार, इथं इयत्ता 9 वी ते 12 वीचे वर्ग प्रत्यक्ष सुरू करता येतील, मात्र शाळा दुपारी 12 वाजेपर्यंतच खुल्या राहतील.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**